# देशात तीन नव्या राष्ट्रीय विज्ञानसंस्था होणार

## डॉ. माशेलकर यांची माहिती

**पुणे, ता. १६ :** "देशात नव्या तीन राष्ट्रीय विज्ञान संस्था सुरू करण्याचा प्रस्ताव आहे," असे वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी आज येथे सांगितले.

पुण्यातील भारतीय विज्ञान संस्थेच्या पहिल्या शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ आज त्यांच्या हस्ते झाला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, "देशात पहिली विज्ञान संस्था १९०८ मध्ये सुरू झाली. या काळात मूलभूत विज्ञानाच्या संशोधनासाठी संस्था वाढण्याची गरज होती. उशिरा का होईना त्याची सुरवात आता होत आहे. पुण्यात व कोलकता येथे एकाच वेळी या संस्थांचे प्रत्यक्ष काम आजपासून सुरू झाले. मोहाली येथील विज्ञान संस्था पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू होईल."

याशिवाय आणखी तीन विज्ञान संस्था सुरू करण्याचा प्रस्ताव पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्यापुढे मांडण्यात आला. गेल्या महिन्यात पंतप्रधानांच्या विज्ञानविषयक सल्लागार समितीच्या बैठकीत संशोधनात्मक प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. एस. शिवराम म्हणाले, संस्थेसाठी शंभर एकर जमीन मिळाली आहे. येत्या काही महिन्यांत नव्या जागेत बांधकामाला सुरवात होईल.'

### असा प्रवेश घ्या...

**मूलभूत विज्ञानातील संशोधनास पुण्यात सुरू झालेल्या या संस्थेत पहिल्या वर्षी एम.एस. (इंटिग्रेटेड) हा बारावीनंतर पाच वर्षांचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. पहिल्या वर्षी प्रवेश मिळालेल्या ४६ विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्रातील फक्त आठ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.**

### प्रवेश कसा घ्याल :

**अभ्यासक्रम : एम.एस.(इंटिग्रेटेड)**

**प्रवेशक्षमता : ४६**

**प्रवेश पद्धती : या वर्षी आयआयटीमार्फत. (पुढील वर्षी स्वतंत्र प्रवेश प्रक्रीया)**



**एनसीएल :** राष्ट्रीय विज्ञान संस्थेच्या पहिल्या शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते बुधवारी झाला. त्यानंतर त्यांनी प्रयोगशाळेची पाहणी केली. त्या वेळी त्यांच्यासोबत संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. कुमार.

### निवृत्तीनंतर पुण्यात : डॉ. माशेलकर

**"येत्या ३१ डिसेंबर रोजी मी निवृत्त होत असून, १ जानेवारी २००७ रोजी मी पुण्यात 'एनसीएल'मध्ये संशोधक म्हणून येणार आहे," असे डॉ. माशेलकर यांनी या वेळी सांगितले.**